# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२**

**( सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )**

अग्रिम प्रत

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १, २, ४, ५, ७ ते १०)**

(१) **श्री.रत्नाकर गुट्टे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात पुरेसा निधी देण्याची घोषणा करणे, त्याच बरोबर श्री गुप्तेश्वर मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी आवश्यक असलेल्या २१ कोटी रुपये निधीचा प्रस्ताव अर्थ विभागाकडून सांस्कृतीक विभागाकडे प्रलंबित असणे, हे मंदिर ता. देगलूर जि. नांदेड येथील मंदिरा एवढेच सुंदर कलेचा प्राचिन व ऐतिहासिक नमूना असणे, श्री गुप्तेश्वर मंदिर अत्यंत जीर्ण झाले असल्याने ही ऐतिहासिक वास्तू नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, सदर मंदिराच्या सभोवती अनेक घरे असल्याने भविष्यात मंदिर पडून गावातील नागरीकांसह पर्यटकांची मोठया प्रमाणात जिवितहानी होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत असणे, त्यामुळे गावकऱ्यांनी अनेकदा मागणी केल्यानंतर पुरातत्व विभागाने मंदिर जिर्णोध्दारासाठी १५ व्या वित्त आयोगाकडून १ कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित केले असणे, त्याप्रमाणे हा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असणे, यामुळे मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केल्यानुसार सांस्कृतिक कार्य विभागाकडील २१ कोटी रूपयाचा प्रस्ताव आणि श्री गुप्तेश्वर मंदीर जिर्णोध्दारासाठी १५ व्या वित्त आयोगाकडून ८ कोटी असे एकूण २९ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मागणी करत असून त्यासाठी अनेक वेळा शासनास निवेदन देवूनही अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली नसल्याने स्थानिक ग्रामस्थ आणि भक्तगण नाराजी व्यक्त करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) डॉ.राहुल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी कृषी विषयक माहिती, कृषी उत्पादनात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध प्रयोग व संधोशन करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कृषी विषयक शिक्षण मिळावे याकरीता परभणी येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात येणे, सदर कृषी विद्यापीठात सद्यःस्थितीत ५२ ते ५३ टक्के कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, सन २०१७ पासून रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, विद्यापीठ प्रशासनामार्फत दर ३ महिन्यांनी शासनाकडे रिक्त पदाबाबतचा अहवाल सादर करण्यात येणे, तथापि परभणी येथील कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी कृषी विषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा होणारा विपरीत परिणाम, त्याचप्रमाणे कृषी विषयक संशोधन करण्यात येत असलेल्या अडचणी, गेल्या काही वर्षापासून मराठवाड्यात ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संकटात सापडलेला असणे, त्यामुळे कृषी विषयक संशोधनाची नितांत आवश्यकता असणे, परंतू कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे संशोधनाचा अभाव भासत असणे, शासनाने रिक्त असलेली सर्व पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होणे, या निमित्त शासनामार्फत ५० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात येणे, परंतू अद्यापही सदर मंजूर निधी विद्यापीठास वर्ग करण्यात न येणे, सदर निधी कृषी क्षेत्राची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने नवनवीन संशोधन कार्य व कृषी विषयक शिक्षण घेणाऱ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या अनुषंगाने अत्यल्प असणे, त्यामुळे सदर निधीत वाढ करुन किमान १०० कोटी रुपये मंजूर करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत निर्णय घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्रीमती यामिनी जाधव, सर्वश्री. सुरेश वरपुडकर, नानाभाऊ पटोले, अमीन पटेल, अशोकराव चव्हाण, झीशान सिद्दिकी, सुनिल कांबळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस बोर्ड, मुंबई अंतर्गत माथाडी कायदा, १९६९ व महाराष्ट्र शासन दिनांक २१ जानेवारी, २००९ च्या आदेशानुसार मे.आर.सी.एफ.लि.चेंबुर येथे टोळी क्र.१९५ व गट 'ड' कार्यरत असणे, सदर गटातील काही कर्मचाऱ्यांची नियमबाहय बदली केल्याने टोळी क्र.१९५ मधील कामगारांनी बोर्डाकडे दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी तक्रार नोंदवणे, तक्रार नोंदविल्याने दिनांक

अग्रिम प्रत

२० जानेवारी, २०२० पासून टोळीतील कर्मचाऱ्यांना काम न देणे, अचानक सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस बोर्ड, मुंबई यांनी माथाडी कायदा आणि महाराष्ट्र शासनाचा दिनांक २१ जानेवारी, २००६ चा निर्णय धाब्यावर बसवून दिनांक ४ जुलै, २०२२ रोजीच्या पत्राद्वारे आदेश पारीत करून टोळी क्र.१९८ मधील कामगार खुर्शिद बेग, सदाशिव पुकळे व रमेश नांगरे यांना आर्थिक लाभाच्या बदल्यात टोळी क्र.२५० मध्ये बदली करणे, त्यातही केवळ खुर्शिद बेग यांनाच कामावर रूजू करून घेणे, सदाशिव पुकळे व रमेश नांगरे यांना कामावर रूजू करून न घेणे, अन्य कामगारांबाबत आकस बाळगून अन्याय करणे,कामगारांच्या ठेवीच्या गैरव्यवहार प्रकरणी मा.कामगार मंत्र्यांच्या आदेशानुसार मा.विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने २५ कोटी ७० लक्ष रूपयांचा कामगारांच्या ठेवी संबंधी अध्यक्ष, लेबर बोर्ड यांनी गैरव्यवहार केल्याबाबत ठपका ठेवून पोलिस चौकशी प्रस्तावित करणे, सचिव, नवीन अखिल महाराष्ट्र माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०२२ रोजी सह आयुक्त कामगार (माथाडी) यांच्याकडे रेल्वे मंडळ सचिव, यांनी नियत वाटपाबाबत दिनांक २० जून, २०२२ च्या आदेशाची अंमलबजावणी केली नसल्याने व हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून टोळी क्र.१९५ च्या कामगारांना कामापासून वंचित ठेवणे, त्यांच्या या कृतीमुळे कामगार आर्थिक अडचणीत सापडणे, त्यामुळे दिनांक ८ एप्रिल, २०२२ रोजीच्या सचिव, दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस बोर्ड,मुंबई यांच्या आदेशाविरूध्द आक्षेप नोंदवून दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस योजना १९७६ च्या कलम (३७) अंतर्गत सदर आदेशाविरूध्द अपील दाखल करणे, त्यावर अद्याप सुनावणी न करणे, ह्याबाबत झालेल्या गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करून दोषींविरुध्द आरोपपत्र दाखल करण्याची आवश्यकता व कामगारांना तातडीने कामावर रूजू करून घेऊन त्यांची आर्थिक कोंडीतून सोडवणूक करण्याची नितांत गरज विचारात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.समाधान आवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"माहे नोव्हेंबर, २०२२ व त्या सुमारास "शालेय पोषण आहार योजने अंतर्गत" सोलापूर जिल्ह्यासहित संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याची बाब उघडकीस येणे, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना पोषणयुक्त आहार मिळावे याकरता सदरची योजना सन २००९ मध्ये शासनामार्फत चालू करण्यात येणे, सदरची योजना मागील १३ वर्षापासून पूर्ण राज्यात चालू असणे, परंतु जिल्हास्तरावर निविदा काढताना अनेक वेळेस संबंधित अधिकाऱ्यांमार्फत ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे शासन नियमाचे पालन न करता

असुधारित प्रत

ठेकेदाराच्या अटी शर्तीनुसार निविदा काढण्यात येत असणे, सदर निविदा काढताना निविदेमध्ये एक दिवस अगोदरच नियमबाह्य धान्याचे नमुने मागवून त्याप्रमाणे ठेकेदार सामूहिकरित्या निविदेचे दर भरत असणे, निविदा भरताना दाखवण्यात येणाऱ्या धान्याचे नमुने व प्रत्यक्षात पुरवठा करण्यात येत असलेल्या धान्यात खूप मोठी तफावत असणे, बहुतांश वेळा सदर ठेकेदारांमार्फत योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणारे चांगल्या प्रतीचे धान्य खुल्या बाजारात विकून त्याऐवजी भेसळयुक्त अन्नधान्य शाळांना पुरविण्यात येत असणे, तसेच शासनाने निश्चित केलेल्या धान्यांच्या दरापेक्षा अधिक किंमतीत धान्य खरेदी करणे, उदाहरणार्थ मागील वर्षभरात शासनाने सर्व जिल्हास्तरावर चणाडाळ व मुगडाळ मोठ्या प्रमाणात वाटप केला असून सरकारी यंत्रणेकडे चणाडाळ रुपये ५२ प्रति किलो, तुरडाळ रुपये ६० प्रति किलो व मुगडाळ रुपये ५८ प्रति किलो या दरात उपलब्ध असताना देखील जाणून-बुजून ठेकेदारांमार्फत शालेय पोषण आहारामध्ये धान्य पुरविताना चणा रुपये ७८ प्रति किलो, मुगडाळ रुपये ९५ प्रति किलो व तूरडाळ रुपये १०५ प्रति किलो या दराने विकत घेण्यात येणे, यामध्ये शासनाच्या पैशांचा मोठ्या प्रमाणात अपहार होत असल्याचे निदर्शनास येणे, अनेक वेळेस जिल्हास्तरावर निघालेल्या निविदेमध्ये ज्या जिल्ह्यामध्ये तीन पेक्षा कमी निविदा आल्या आहेत त्या ठिकाणी शासन नियमानुसार निविदा काढणे आवश्यक असताना संबंधित अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून बाजूच्या जिल्ह्यातील ठेकेदारालाच सदरचे काम देत असल्याचे निदर्शनास येणे, या सर्व अवैध प्रकाराला आळा बसावा याकरता प्रत्यक्षात ठेकेदारांना सदरचे काम देण्याऐवजी गरजू महिला बचत गटांना सदरचे काम देण्यासंदर्भातची मागणी सामाजिक संस्थेमार्फत वारंवार करण्यात येणे, तसेच सर्व धान्य खरेदी शासनाच्या नाफेड किंवा दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑप मार्केटिंग फेडरेशन यांचेकडून करण्याची आवश्यकता असणे, शासनाच्या योजनेचा गैरवापर करून स्वत:चे खिसे भरणारे अधिकारी व ठेकेदार हे दोघे संगनमताने करत असलेल्या भ्रष्टाचारामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होणार असणे, याबाबत संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे विरुद्ध सर्वसामान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरलेला असणे, यावर उपाय म्हणून शासनाने तातडीने उच्चस्तरीय समिती नेमून होत असलेला व झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर ताबडतोब करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अस्वीकृत

(५) **सर्वश्री.नारायण कुचे, संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जिल्हा जालना येथील जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जागतिक कोरोना महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले असणे, तसेच उपरोक्त अधिकारी यांनी कोरोना काळात जागतिक आरोग्य संघटनेने किंवा शासनाने कोरोना प्रतिबंधात्मक औषधे व इतर उपकरणे यांचा पुरवठा केला किंवा यांच्या खरेदीमध्येही मोठया प्रमाणात आर्थिक अपहार केल्या असल्याचेही निदर्शनास आलेले असणे, तसेच उपरोक्त प्रकारामुळे व डॉक्टर खातगावकर अशा भ्रष्ट अधिकारी यांच्या भ्रष्टाचारी कृत्यामुळे शासनाचा करोडो रुपयाच्या निधीचा चुराडा झाला असल्याचेही निदर्शनास आलेले असणे, तसेच उपरोक्त प्रकारामुळे स्थानिक वर्तमानपत्र व विविध समाजमाध्यमांमध्ये या डॉक्टर अधिकारी यांचा भ्रष्टाचार उघड झाल्यामुळे जनमानसात आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडाला असल्याचेही आढळून येत असणे, तसेच उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली नसल्याने व या भ्रष्टाचार करणाऱ्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर खातगावकर यांचेवर कोणतीही कारवाई किंवा चौकशी न केल्यामुळे सामान्य जनतेत शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची लाट उसळली असणे,परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.दिपक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सातारा जिल्ह्यात माहे ऑगस्ट, २०२२ तसेच माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, शासनाने पिडीत शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य केले असले तरी ते तुटपुंज्या स्वरुपात असणे, दरम्यानच्या काळात मा.मुख्यमंत्री महोदय तसेच मा.उप मुख्यमंत्री महोदय यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निकषाबाहेर जाऊन मदत करण्यात येईल असे घोषित केल्याचे निदर्शनास येणे, तथापि, निकषात बसणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ही मदत न मिळाल्याचे आढळून येणे, शेती व अन्य मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही विशेषत: सातारा जिल्ह्याचा त्यामध्ये समावेश केला नसल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर याशिवाय कर्जमाफी योजनेतील अनेक पात्र शेतकरी देखील प्रोत्साहनपर योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परिणामी सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याची भावना, शासनाने याबाबत चौकशी करुन आर्थिक लाभापासून व वाढीव मदतीपासून तसेच प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना

अप्रकाशित

शासनाने मदत करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मौजे चेंबूर, तालुका-कुर्ला, न.भू.क्र. १७२९ पैकी या मिळकतीवर RISID १३२ मधील क्लस्टर MW०२८, MW०२९ , MW०३० , MW०३१, MW०३२, MW०३३, MW०३४ या झोपडपट्टी समूहातील सिंधी विस्थापित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आल्याचे मा.उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण / निष्कासन) तथा सक्षम प्राधिकरण चेंबूर-०२, सक्षम प्राधिकरण चेंबूर १०, झो.पु.प्रा. मुंबई यांच्या पत्र क्र.स.ग्रा.१०/झो.पु.प्रा/का.वि./२०२१, दि.२४.०९.२०२१ जा.क्र.१३७४/२१ अन्वये जाहीर सूचना देण्यात येणे, सदर भूखंडावर सिंधी विस्थापित ओल्ड व आर.सी. बॅरेक तसेच एम. एस. बिल्डिंग असून त्यापैकी फक्त ओल्ड व आर. सी. बॅरेक हा झोपडपट्टी भाग असल्याची घोषणा उक्त जाहीर सुचना कशाच्या आधारावर / निकषांवर करण्यात आली याबाबत स्पष्टता नसणे, चेंबूर बॅरेक मधील रहिवाशी हे नियमितपणे शासनाचा मालमत्ता कर भरत असून खरेदी विक्री प्रसंगी मुद्रांक शुल्क भरून ते मालमत्ता पत्रक धारक असणे, तसेच भारत-पाकिस्तान फाळणी वेळी भारत सरकारकडून त्या रहिवाशांना सनद प्राप्त झालेली असणे, याबाबत चेंबूर बॅरेक बचाव संघर्ष समिती तेथील रहिवाशी संघटनेने शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची शासनाने दखल न घेणे, तसेच सदर ठिकाणी पुर्नविकास करण्यासंबंधित धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठीत करणे, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर करणे, उक्त समितीच्या अहवालानुसार शासनाने धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री.बळवंत वानखडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात शेतकरी आत्महत्याप्रवणग्रस्त १३ जिल्हे असून देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या राज्यातील अमरावती विभागात होत असणे, गेल्या दोन दशकात जिल्ह्यात ५ हजार शेतकरी आत्महत्या झालेल्या असणे, यात विशेषत: अमरावती जिल्हा प्रथम क्रमांकावर असणे, जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या संघर्षावर नैराश्य सातत्याने मात करत असणे, यामुळे अमरावती जिल्ह्यात मागील ११ महिन्यात एकूण २९० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव नजीकच्या काळात निदर्शनास आलेले असणे, जिल्ह्यातील विविध भागात दर १५ तासात एक शेतकरी आत्महत्या होत असणे, नुकताच

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील स्व. विनायक म. दाभाडे या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणामुळे मुलीच्या कॉलेजची फी भरण्यासाठी पैसे नसल्याने मागील आठवड्यात आत्महत्या केलेली असणे, असे भयाण वास्तव असून देशात तसेच राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या जिल्ह्यात होत असताना शासन तसेच जिल्हा प्रशासन गंभीर नसल्याचे निदर्शनास येणे, नैसर्गिक आपत्ती, नापिकी, कर्जबाजारी, कर्जवसुलीचा तगादा, आजारपण, कुटुंबाचे संगोपन यामुळे शेतकऱ्यांचा धीर खचत असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने समुपदेशानासाठी कुठल्याही उपाययोजना केल्या जात नसणे, तसेच शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध आवश्यक योजनांचा लाभ गरजू शेतकऱ्यांना मिळत नसणे, सन २००१ पासून ते नोव्हेंबर २०२२ पर्यंत जिल्ह्यात एकूण ४४८४ शेतकरी आत्महत्या झालेल्या असून यापैकी २४१२ प्रकरणात शासन मदत देण्यात आलेली असणे, तसेच २३९६ प्रकरणे अपात्र ठरवण्यात आलेली असून ७६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबीत असणे, यामुळे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबामध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, सातत्याने होत असलेल्या शेतकरी आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.दादाराव केचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावर वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघातील विरूळ - रसुलाबाद - सोरटा – पिंपळगांव - सावरखेडा - निजामपूर टाकळी - वडाळा इत्यादी गावे येत असणे, रस्त्यावरील कामे सुरू असल्याने मार्गाला लागून शेतकऱ्यांच्या शेतातील सर्व पिके धुळीने उध्वस्त होणे, या संदर्भात उपविभागीय अधिकारी यांच्या माध्यमातून सर्व्हे करण्यात येणे, परंतु त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या पिकांना मोबदला न मिळणे, समृध्दी महामार्गाच्या बाजूला शेतकऱ्यांच्या शेतात जाणारे रस्ते उध्वस्त होणे, महामार्गाचे खाली उतरणारे पाणी पूर्णत: शेतकऱ्यांच्या शेतामध्ये उतरणे त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये २-३ फुट पाणी जमा होऊन पिके उध्वस्त होणे, व समृध्दी महामार्गालगत संरक्षण भिंतीच्या बांधकामामुळे शेतकऱ्यांचे शेतातील पाणी निघण्याचा मार्ग पुर्णत: बंद असल्याने शेतकरी उध्वस्त होत असल्यामुळे तात्काळ उपाययोजना करण्याची गरज असणे, शेतकऱ्याच्या शेताला लागून वरून येणारे पाणी अडविण्याच्या दृष्टीने नाली बांधकाम करण्याची गरज निर्माण होणे, वर्धा जिल्ह्यातील आर्वी-वर्धा व तळेगांव - आष्टी - द्रुगवाडा या महामार्गाचे काम पूर्ण झाले असतांनाही विभागाने महामार्गावर दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांचा विचार न करता व योग्य नियोजन न केल्यामुळे रस्त्यावरील पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये उतरल्याने पिके उध्वस्त होणे, तसेच शेतकऱ्यांना जाण्या-येण्याच्या दृष्टीने वाहिपेरीचे रस्ते नामशेष झाल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला असणे, शासनाने या सर्व बाबीचा गांभीर्याने विचार करून पिकांचा

अप्रकाशित

मोबदला, पाणी अडविण्याच्या दृष्टीने नाली बांधकाम व वाहिपेरीचे रस्ते तातडीने करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे, वडगाव बुद्रुक, नऱ्हे, वारजे गावाच्या हद्दीतून जाणारा राष्ट्रीय महामार्गाचा रस्ता जांभूळवाडी (दरीपुल) बोगद्यामार्गे मुंबई - बंगळुरू असा असणे, गेल्या काही वर्षात या परिसरात मोठ्या अपघातांचे सत्र सुरू असणे, या ठिकाणी गेल्या आठ वर्षांमध्ये १८८ हुन अधिक अपघात झाले असून त्यामध्ये ६६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असणे, मात्र ठोस उपाययोजना करण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये तीव्र असंतोष पसरला असणे, अपघातांचे प्रमुख कारण म्हणजे या परिसरातील असणारा तीव्र उतार असल्याचेही दिसून येत असणे, अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असताना प्रशासन तात्पुरते उपाय करत असल्याचे निदर्शनास येत असणे, अपघात सुरूच असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची स्थानिकांची मागणी असणे, या महामार्गावरील अपघातांची प्रमुख कारणे तीव्र उतार असल्याने अवजड वाहनांना अचानक ब्रेक लागत नाही, काही ठिकाणी सेवा रस्ते नसल्याने स्थानिक वाहनचालकांना राष्ट्रीय महामार्गवरुन प्रवास करावा लागत असणे, नवले पुल परिसरात वारंवार घडणाऱ्या अपघाताला प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासह पुणे महापालिका प्रशासन, पीएएमआरडीए ही तितकीच जबाबदार असणे, या भागातील रस्त्यावरील उतार हा ४.२५% ग्रेडियंट इतका असून हील टॉप परिसरातील असणाऱ्या महामार्गावर ५ % इतका ग्रेडियंट आवश्यक असणे, यासाठी कायमस्वरूपी ठोस उपाययोजना म्हणून मुख्य उतार कमी करणे, स्वामी नारायण मंदिर ते दरीपुल यामधील तीव्र वळण कमी करणे, सर्व्हिस रस्ते सलग तयार करून रुंद करणे, दुरुस्ती करणे, तेथील अतिक्रमणे काढणे, अनधिकृत होर्डिंग काढणे, रिंगरोड तयार करून वाहतूक शहराबाहेरून वळविणे, वारजे ते नवले पूल, नवले पूल ते कात्रज दरम्यान सर्व्हिस रस्ता करणे गरजेचे असून सर्व स्थानिक वाहतूक ही सर्व्हिस रस्त्यावरून होईल. याबाबत योग्य त्या उपाययोजना करणे, साधारणतः १५ वर्षापूर्वी वारजे, वडगाव, कात्रजच्या महापालिकेच्या डीपी प्लॅनमध्ये महामार्गाच्या बाजूला १२ मीटरचा सर्व्हिस रस्ता दर्शविला असणे परंतु तो पूर्ण करण्यात आलेला नसणे, प्रामुख्याने महापालिकेच्या अखत्यारीतील नवले पूल, वडगाव ते वारजे या भागातील सर्व्हिस रस्त्याचे काम पूर्णतः झाले नसणे, यामार्गांवर अनेक जागी खड्डे पडले असणे, याच भागातील नवले पूल (डेक्कन पव्हेलीयन हॉटेल) ते कात्रज रस्त्याची दूरावस्था झाली असून जागोजागी पडलेल्या खड्ड्यामुळे वारंवार अपघाताच्या घटना घडत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अशासकीय

(११) **सर्वश्री. जयकुमार रावल, योगेश सागर, राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक विभागातील धुळे, नंदुरबार, नाशिक या जिल्हयातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची, जिल्हा परिषदेची व सार्वजनिक बांधकाम विभागाची विविध रस्त्यांची विकास कामे वर्षानुवर्षे दिरंगाईने सुरु असणे, सदर प्रलंबीत असलेली विकास कामे मे. निलेश इंन्फ्रास्टक्चर प्रा. लि. या एकाच कंत्राटदाराची असल्याबाबतची गंभीर बाब निदर्शनास येणे, सदर कंत्राटदाराची बीड कॅपॅसिटी नसतांना देखील त्यास अधिक रकमेच्या कामांचे वाटप संबंधित विभागाकडुन करण्यात येणे, मे.निलेश इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी विविध निविदा प्रक्रीयेत भाग घेतांना खोटी कागदपत्रे व माहिती विभागाला सादर करणे, याबाबतीत स्थानिक जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाला कागदपत्रांसहीत तक्रार करुन देखील सदर कंत्राटदाराला नियमबाहय कामांचे वाटप करणे सुरुच असणे, संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन मे. निलेश इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी ग्रामविकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांचे कंत्राट घेतल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, सदर प्रलंबित कामांमुळे स्थानिक नागरीकांना रस्ते अपघातासह विविध वाहतुकीच्या समस्यांना सामोरे जावे लागणे, सदर ५ ते ७ वर्षांपासून प्रलंबित रस्ते विकास कामांच्या बाबतीत स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी यांनी मे. निलेश इंन्फ्रास्टक्चर प्रा. लि. या कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्याबाबत व नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याबाबत वारंवार तक्रारी करणे, सदर तक्रारींची कोणतीही गंभीर दखल घेण्यात न येणे, केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी अशा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व विविध रस्ते विकास कामांच्या बाबतीत स्थानिक प्रशासनाकडुन करण्यात येत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

अप्रकाशित प्रत

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पनचक्की, औरंगाबाद यांचे सन २००२-२००३ ते सन २००८-२००९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री** : **(क)** लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२१-२०२२

अग्रिम प्रत

या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) पशुसंवर्धन, दुग्धविकास मंत्री** : **(क)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ (२०२२ चा १७) चे कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालविलेल्या तसेच अनुदान दिलेल्या शैक्षणिक संस्थामधील अध्यापक

अशुद्धारित प्रत

संवर्गातील सर्व विषयातील मंजूर पदांना संवर्गनिहाय आरक्षण लागू करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण २०१९ / प्र.क्र.९४ / १९ / विशि-१ दिनांक ७ एप्रिल, २०२२ सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक रूसाये- २०१९ / प्र.क्र. १८६ / -३, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ अन्वये हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठ फंडाची तरतूद प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०१९ / प्र.क्र.१८५ / विशि-३, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ सभागृहासमोर ठेवतील.

**(५) आदिवासी विकास मंत्री** : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(६) उद्योग मंत्री** : **(क)** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा ५४ वा वार्षिक

असुधारित प्रत

अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ५)**

(१) **श्री.हिरामण खोसकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असल्याने या ठिकाणी दररोज हजारो भाविक दर्शनासाठी व धार्मिक विधीसाठी येत असून इगतपुरीमध्ये जागतिक विपश्यना केंद्र असल्याने ध्यानधारणा करण्याकरिता देशविदेशातून मोठया प्रमाणात पर्यटकांची गर्दी होणे, पर्यटन व धार्मिक देवस्थान असल्याने नाशिक जिल्हयात मूलभूत सुविधा तातडीने पुरविणे आवश्यक असतांना शहराचा विकास करतांना स्थानिक रहिवाशांना व लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेणे, त्र्यंबकेश्वर शहराचा विकास करण्याकरिता निधी मिळूनही वेळेत कामे न झाल्यामुळे हा निधी अखर्चित राहणे, त्यामुळे विकास कामांना अडचणी निर्माण होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. पराग अळवणी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील बोरिवली (पूर्व) येथील नूतननगर, नेहरूनगर, संतोषनगर, दौलतनगर व दहिसर (प) येथील इंदिरानगर या वस्तीत सुमारे ११११ झोपडीधारक गेल्या ३५ ते ४०

अप्रकाशित प्रत

वर्षापासून राहत असणे, या झोपडीधारकांकडे १९९५ चे ओळखपत्र, रेशन कार्ड, विज बिल, फोटो पास आणि सेन्सेस सर्टिफिकेट इत्यादी सर्व कायदेशीर पुरावे असणे, परंतु या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनाकडून झोपडी निष्कासित करण्याची वारंवार नोटीस बजाविण्यात येणे, झोपडीधारकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी रेल्वे कार्यालय, मुंबई सेंट्रल येथे बोलविण्यात येणे व त्यावेळी त्यांच्याकडून आवश्यक पुरावे सादर करण्यात येणे, या झोपडीधारकांवर रेल्वे प्रशासनाकडून होणारी कारवाई स्थगित करण्याची होत असलेली मागणी, यासाठी रेल्वे प्रशासनाकडे राज्य शासनाने करावयाची शिफारस, संबंधित झोपडीधारकांचे एमएमआरडीएच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री.अमीन पटेल, अशोकराव चव्हाण, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, अमित देशमुख, अमित झनक, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. झीशान सिद्दिकी, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री. कुणाल पाटील, संग्राम थोपटे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई मधील मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात कामाठीपुरा परिसर येणे, श्रीमंत थाटाचा वारसा व ऐतिहासिक दर्जा असलेला असा हा मुंबईतील एक विभाग असणे, सन १७९५ च्या पुढे कामाठी नागरीक या ठिकाणी वास्तव्यास येणे, त्यामुळे हा परिसर कामाठीपुरा ह्या नावाने ओळखला जाऊ लागणे, या परिसरात मध्यमवर्गीय बहुभाषिक लोकांची वस्ती असणे, या विभागात अनेक जुन्या व जीर्ण चाळी असणे, या विभागातील इमारतींची अवस्था दुरुस्ती न होण्यासारखी असणे, त्यामुळे या विभागातील इमारतींचा लवकरात लवकर पुर्नविकास होणे गरजेचे असणे, यासाठी शासनस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा सुरु असणे, तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामाठीपुरा परिसराचा पुर्नविकास लवकरच होणार असे घोषित करणे, विद्यमान उप मुख्यमंत्री महोदयांनी देखील जुलै, २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये कामाठीपुरा विभागातील इमारतींच्या पुर्नविकासाच्या निर्णयास सरकारचा पाठिंबा असल्याचे जाहीर करणे, यासंदर्भात विद्यमान उप मुख्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण, मुख्याधिकारी म्हाडा, यांच्या प्रत्येक वेळी आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमधून पुर्नविकास संदर्भात सकारात्मक निर्णय होणे, कामाठीपुरा पुर्नविकास समितीच्या अंतर्गत ८०० जागामालक आणि अंदाजे ८००० रहिवाशी जोडले गेले असणे, त्याअनुषंगाने म्हाडाला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात येणे, कामाठीपुरा लॅन्डलॉर्ड वेल्फेअर असोशिएशन यांनी पुर्नविकास प्रक्रियेस गती यावी यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट कंस्लटंट यांची नियुक्ती केलेली असणे, मागील अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या पाठपुराव्याचे व

व्यवहार्यतेचे सर्व दस्तावेज या समितीकडून शासनस्तरावर सादर करण्यात आलेले असणे, त्याचप्रमाणे पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या अंतर्गत येणाऱ्या इमारतींची अवस्था विशेषतः उमरखाडी, नागपाडा, बीआयटी मुंबई सेंट्रल विभागातील इमारतींची अवस्था बिकट असणे, या इमारतींच्या पुनर्विकासाला शासनाकडून मंजुरी मिळणे, परंतु आजमितीपर्यंत त्याचे आदेश न निघणे, मुंबईतील महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळावीत यासाठी वारंवार मागणी होत असणे, या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना तयार करण्यात येणे, सदर योजनेअंतर्गत सफाई कामगारांना २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झाल्यास सेवानिवृत्तीनंतर किंवा सेवेत कार्यरत असताना त्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या पात्र वारसास मालकी तत्वावर सदनिका मोफत उपलब्ध करून देणेकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अनुदान वितरित करण्याबाबतचा निर्णय शासन निर्णयान्वये घेण्यात येणे, सदर योजना मागील पंधरा वर्षांपासून कागदावरच असणे, किमान २५ वर्षे सेवा झाल्यास सेवानिवृत्तीनंतर किंवा सेवेत कार्यरत असताना त्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या पात्र वारसास मालकी हक्क देण्याचा निर्णय मुंबईमध्ये लागू न होणे, सदर सदनिकांकरीता सफाई कामगारांचे वारंवार अर्ज प्राप्त होणे, परिवार वाढल्यामुळे मुंबईत राहणारा सफाई कामगार मुंबई बाहेर फेकला जाणे, सद्यस्थितीत अचानक उद्भवलेल्या करोना महामारीमध्ये सुद्धा जीवाची पर्वा न करीता कामगारांनी साफसफाईचे काम केले असणे, अजूनही आपल्याला घर मिळेल या आशेवर असणाऱ्या सफाई कामगारांच्या पदरी निराशा पडणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये आणि सफाई कामगारांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना.”

(४) **श्री. योगेश कदम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोकणात वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकांची होत असलेली नासाडी, सिंधुदुर्ग-रत्नागिरी जिल्हयात आंबा आणि काजू, नारळ व अन्य पिकांचे होत असलेली लागवड, त्यातच डिसेंबर महिन्यात आंबा व काजू पिकांना मोहर येण्यास सुरुवात झालेली असतांना माकड व वानर या प्राण्यांकडून मोठया प्रमाणात मोहराचे करण्यात येत असलेले नुकसान, परिणामी आंबा व काजूच्या उत्पादनास मुकावे लागणे, त्यातच शासनाकडून विलंबाने व तुटपुंजी नुकसान भरपाई देण्यात येणे, त्यामुळे बागायतदार व शेतकरी आर्थिक संकटात येणे, माकड व वानर यांच्या होणा-या उपद्रवास आळा घालण्याची आवश्यकता, शेतपिक नुकसान भरपाईच्या तरतुदीमध्ये २०१५ नंतर सुधारणा झालेली नसणे, त्याकरिता शासनाने शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही यांचा बंदोबस्त करण्याकरिता दिनांक ०२/०९/२०१४ रोजी मार्गदर्शक सूचना जारी करणे, त्यानुसार शासन परिपत्रक क्रमांक

डब्ल्यूएलप ०८१४/प्र.क्र.१८६/फ-१ दिनांक २२ जुलै, २०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार त्याच धर्तीवर माकड व वानर यांचा समावेश करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच सर्व उपद्रवकारक वन्यप्राण्यांना शासन निर्णय लागू करणे, नुकसान भरपाईच्या रक्कमेत सध्याच्या बाजारभावाप्रमाणे वाढ करण्यात यावी, शेतपिकाव्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या होणाऱ्या सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या नुकसानाची भरपाई देण्यात यावी,त्याचबरोबर शासन निर्णयामध्ये फळबाग नुकसान भरपाई ठरविण्याची कार्यपध्दती ठरविण्यात यावी, जसे की, आंबा मोहर व पालवी यांचे नुकसान झाल्यास किती नुकसान भरपाई देण्यात यावी याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे, नविन आंबा लागवडीत पालवी खाल्ल्याने रोपांची वाढ खुंटते अशा शेतकऱ्यांना त्याची भरपाई देण्याची पध्दत सुस्पष्ट करणे, आदी बाबीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, तसेच पिकांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनाने प्राधान्याने घ्यावी व सोलर कुंपणाची योजना उपद्रवकारक प्राण्यांकरिता उपयुक्त ठरत असल्याने ती योजना संपूर्ण राज्यात राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने अग्रक्रमाने घेण्याची गरज, राज्य शासनाच्या शिफारशीवरुन हिमाचल प्रदेश राज्यामध्ये सन २०१६ मध्ये केंद्राने लाल तोंडाच्या माकडाला अनुसूची पाचमध्ये एका वर्षासाठी समाविष्ट करण्यात आले होते त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने केंद्राकडे तशी मागणी करुन याबाबत पाठपुरावा करण्यात यावा, उक्त सर्व बाबीचा शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर सत्वर निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा दिनांक १ एप्रिल, १९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या असणे, सदर ३० टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या असणे, उक्त शासन निर्णय अधिक्रमित करुन शासन निर्णय क्र.८३/२००१/मसंआ-२०००/प्र.क्र.४१५/का-१ दिनांक २५ मे, २००१ रोजी निर्गमित केलेला असणे, सदर शासन निर्णयातील आरक्षणाची व्याप्ती,अटी व शर्ती क्र.(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरूष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे अशा अटी व शर्ती असणे, सदर अटींमुळे महिलांवर अन्याय होत असून त्यांना त्यांच्या हक्काच्या असलेल्या आरक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, सदरच्या अटी व शर्ती मध्ये सुधारणा करण्याबाबत महिलांची अनेक वर्षांपासून मागणी असणे, सदर शासन निर्णयातील क्र.(७) वरील अट शिथिल करुन सदर भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील

अप्रकाशित

महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवारांमधूनच भरण्यात यावे अशी सुधारणा करुन सदर सुधारित शासन निर्णय निर्गमित करुन नोकरभरतीत महिलांवरील होणारा अन्याय दूर करणे, तरी पूर्वीच्या शासन निर्णयात सुधारणा करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे महानगरपालिका हद्दीतील वर्तकनगर भागामध्ये राज्य शासनातर्फे पोलिसांना घरे देण्यात आलेली असणे, वर्तकनगर मधील पोलिस वसाहतीमध्ये तळ अधिक चार किंवा पाच मजली असलेल्या दहा इमारतींमध्ये एकूण ५५० पोलिस कुटुंबिय वास्तव्यास असणे, परंतू, काळानुरूप इमारतींची पडझड होत असल्यामुळे या इमारती अति धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या असणे, घरे धोकादायक झाल्याच्या कारणावरून पोलिस आणि महापालिका प्रशासनाने गेल्या पाच वर्षांपूर्वी वास्तव्य करीत असलेल्या पोलिस कुंटुबियांना घरे खाली करण्यास सांगणे, परंतू, वर्षानुवर्षे राहत असलेले पोलिस कुटुंबिय घरे खाली करण्यास तयार नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून पुढाकार घेऊन "तुम्हाला त्याच ठिकाणी नविन इमारती बांधण्यात येऊन घरे दिली जातील" असे सांगितल्यामुळे आमच्या शब्दावर विश्वास ठेवून काही पोलिस कुटुंबिय रेन्टल हाऊसिंगमध्ये स्थलांतरीत झाले तर काहींना राहण्याची वैयक्तिक सोय करावी लागणे, पोलिसांना मालकी तत्वावर कायमस्वरूपी घरे मिळण्याच्या आशेवर अनेक पोलिस सेवानिवृत्त झाले तर काही मृत पावले, परंतू, अद्यापपर्यंत वर्तकनगर मधील पोलिस वसाहतीतील ५५० कुटुंबियांना घरे मिळालेली नसणे, गेल्या ५ वर्षांपूर्वी इमारती खाली करून सुध्दा राज्य शासनाने बांधकाम सुरू न करणे, त्या ठिकाणी नविन इमारती बांधण्यासाठी निविदा प्रक्रिया सुध्दा झालेली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून याकरिता शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही शासकिय अधिकाऱ्यांच्या अडेलतट्टु कारभारामुळे वर्तकनगर मधील पोलिस कुटुंबियांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र दिसत असणे, वर्तकनगरमधील पोलिस वसाहतीचा पुनर्विकास करून सदरहू घरे उपलब्ध करण्याबरोबरच "ना नफा ना तोटा" या आधारे विद्यमान पोलिस तसेच सेवानिवृत्त आणि मृत पावलेल्या पोलिस कुटुंबियांना अल्पदरात मालकी तत्वावर कायमस्वरूपी घरे देण्याकरिता शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(७) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"विदर्भात "वैनगंगा ते नळगंगा" हा एकमेव नदी जोड प्रकल्प प्रस्तावित असणे, या प्रकल्पाचा नॅशनल वाटर डेव्हलपमेंट एजन्सी (NWDA) कडून प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असणे, या प्रकल्प अहवालानुसार वैनगंगा नदीचे अतिरिक्त पुराचे पाणी, नागपूर-वर्धा अमरावती-अकोला-नळगंगा (ता.मोताळा जि.बुलडाणा) या मार्गावरील कमीत कमी ४० धरण साठ्यात आपआपल्या कॅचमेंट एरियाला सरप्लस म्हणुन, पाणी उपलब्ध करून देण्याची योजना असणे, ज्याव्दारे एखाद्या वर्षी पाऊस कमी पडला तरीही, जलसाठे १००% पूर्ण क्षमतेने भरलेले राहतील असे असले तरीही विदर्भातील या एकमेव नदीजोड प्रकल्पातून पश्चिम विदर्भातील ४०% च भूभागाला फायदा होणे, परंतु प्रकर्षाने आवश्यक असलेल्या घाटमाथ्यावरील बुलडाणा-वाशीम यवतमाळ-चंद्रपूर इत्यादीचा ६०% भूभाग या प्रकल्पापासून वंचित राहणे, पश्चिम विदर्भातील ही वास्तव उणीव भरून काढण्याकरिता, या नदीजोड प्रकल्पामध्ये खामगाव जिल्हा बुलढाणा ते घाटमाथ्यावरील मन व पैनगंगा नदी पुन्हा जीवित करण्यासाठी ४७ किमीच्या प्रकल्पाचा विस्तार करण्याची आवश्यकता, यामुळे या नदीजोड प्रकल्पाच्या संभावित मार्गावरील भंडारा-नागपूर-वर्धा अमरावती-अकोला-बुलढाणा घाटमाथ्यावरील बुलढाणा-वाशीम यवतमाळ-चंद्रपूर हे सर्व जिल्हे कायमस्वरूपी सुजलाम सुफलाम होणे, अशा या नदीजोड प्रकल्पामुळे संपूर्ण विदर्भात पाणी प्रदक्षिणा घेऊन पैनगंगा नदीमार्गे, विदर्भ संपता संपता आणि तेलंगाना राज्य लागण्याअगोदर पुनश्च: वैनगंगा नदीपात्रात पाणी पोहचेल, संपूर्ण विदर्भाला प्रदक्षिणा घालणारी हि जलवाहिनी उद्याच्या विदर्भाचे उज्वल भविष्य असणे, याकरिता बुलडाणा जिल्ह्यातील घाट माथ्यावरील मन आणि पैनगंगा नदीत पाणी सोडण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दक्षिण सोलापूर मध्ये अवैध कत्तलखाने असल्याचे उघड होणे सदर कत्तलखान्यात बांग्लादेशी घुसखोर असल्याची धक्कादायक बाब माहे नोव्हेंबर, २०२२ समोर येणे अनधिकृत कत्तलखाने असल्याने तेथील स्थानिक नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक प्रशासन सदर प्रकरणाबाबत गंभीर नसल्याचे दिसून येणे, तक्रार असूनही कोणतीही कारवाई होत नसून स्थानिक प्रशासन कोणतीही कारवाई करत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे, सदर प्रकरणी स्थानिक प्रशासनावर प्रचंड दबाव असल्याची शक्यता निर्माण

अप्रकाशित प्रत

होणे, सदर प्रकरणी कोणाचा दबाव आहे हे शोधून काढण्याची गरज असणे, सदर अवैध कत्तलखान्यामुळे स्थानिक ठिकाणी रोगराई पसरत असून तेथे पाणी प्रदूषण होऊन वेगवेगळे आजार पसरत असल्याची बाब समोर येणे, त्या ठिकाणी बांग्लादेशी घुसखोर असल्याची बाब समोर आल्याने सुरक्षतेचे प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे, तेथे या संबंधात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.प्रशांत बंब, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये स्थापत्य पदविका (Diploma) आधारे नोकरीवर रुजु होऊन शासकिय नियमाचे उल्लंघन करत पदोन्नती मिळवून शहर अभियंता पर्यंत पदोन्नती मिळविणे, पदवीधर अभियंत्याला डावलून स्थापत्य पदविका (Diploma) धारक असलेल्या श्री.पानझडे यांना पदोन्नती देणे, शहर अभियंता हे अधीक्षक अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांचे पद असणे, विशेषतः महानगरपालिकामध्ये सदर पद इतर विभागाकडून अधिकारी नेमणूक करुन भरती करणे अनिवार्य असणे, परंतु श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांना शहर अभियंता या पदावर संबंधितांनी नियमांचे उल्लंघन करत नेमणूक दिलेली असणे, शहर अभियंता पदावर कार्यरत असतांना चूकीचे अंदाजपत्रक तयार करणे, खोटे अंदाजपत्रक तयार करणे (faulty estimate), Improvement of various roads करतांना जाणीवपूर्वक निविदा किंमत, काम आवंटीत करतांना नियमांचे उल्लंघन करणे, मर्जीच्या ठेकेदारांना नियम डावलून काम आवंटीत करणे, अर्थात निविदा आवंटीत करण्यामध्ये भ्रष्टाचार करणे, याबाबतची चौकशी होऊन श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांच्यावर कारवाई झालेली असणे, तदनंतर शासन निर्णय क्र.आरईएम-१५०९/प्रक्र-५८/२००९/१३ दि.१४ जानेवारी, २०१० चे उल्लंघन करुन अशा आरोपसिध्द झालेल्या कर्मचाऱ्याला/ अधिकाऱ्याला पुन्हा सेवेत करारपध्दतीवर रुजु करणे, सेवानिवृत्त झाल्यानंतरही गैरमार्गाने करारपध्दतीवर स्वत:ची पुन्हा नेमणूक करुन घेणे, करारपध्दतीवर जी नेमणुक झाली ती शासन निर्णय क्र.CBE ८३९३ /प्रक्र ३८/९३/१३ दि.१५ फेब्रुवारी १९९५ याबाबतची अंमलबजावणी करण्याऐवजी उल्लंघन करणे, करारपध्दतीवर नेमणुक करतेवेळेस जबाबदारी(Accountability) निश्चित न करता नेमणूक करणे, अर्थात भ्रष्टाचाराला मुभा देणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन सदर करारपध्दतीने निवडल्या गेलेल्या अधिकारी कर्मचारी यांना तांत्रिक मान्यता व प्रशासकिय मान्यता असे महत्वाचे दस्तावेजावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार नसतांना श्री. पानझडे यांनी सर्रास स्वाक्षरी करणे, तसेच Smart City अंतर्गत कामांचे रु.३१७.२२ कोटी करीता तांत्रिक मान्यता प्रदान करणे, ज्या रस्त्याकरीता सदर तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली उदाहरण म्हणुन अनुक्रमांक ४६ वर नेहरु भवन ते औरंगपूरा रस्त्याचे अंदाजपत्रकामध्ये

ज्याची किंमत २.०७ कोटी अशी असणे, त्या रस्त्याचे अंदाजपत्रक खोटे व बनावटी तयार करणे, त्याबाबतची तक्रार दि. २५/०७/२०२२ रोजी होणे, याबाबत आजतागायत चौकशी न करणे, असे असतांना वारंवार कंत्राटी पध्दतीवर श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांचीच फेरनिवड करणे व वारंवार मुदतवाढ देणे, त्यानुषंगाने शासनाची आर्थिक फसवणुक करणे, या सर्व गैरमार्गाने कमविलेल्या संपत्तीतून श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांनी झाल्टा ता. औरंगाबाद जि. औरंगाबाद येथे गट क्र. १७ फेर क्र.७६३, गट क्र.१४ फेर क्र.७६३, गट क्र.१८ मध्ये फेर क्र.८०२, गट क्र.१६ फेर क्र.७६३, गट क्र.१२ फेर क्र.२१७, गट क्र.११ फेर क्र.४००, गट क्र.९ फेर क्र.१२३५, गट क्र.२५ फेर क्र.७८६, गट क्र.१० फेर क्र.८८०, गांव लिंबे जळगांव ता. पैठण येथे गट क्र.२१ फेर क्र.३९१९, नगर भूमापन क्रमांक १२८७८ शिट क्र.८२ खरेदी सहायक दुय्यम निबंधक, औरंगाबाद ५ व खरेदी दि.१९/०६/२०१४ आणि २७/१२/२०१८ फेर क्र.१६००१ दि.३/११/२०२१ फेर क्र.१६२३८ दि. ४/१२/२०२१, वर नमूद केलेले भूखंड हे कोट्यावधी रुपयांची असणे, कमी भाव दाखवून रजिस्ट्री करणे, श्री.सखाराम धोंडीबा पानझडे यांनी सेवेत असतांना स्वतःच्या नांवाने व त्यांच्या पत्नी आणि मुलगा यांचे नांवाने मालमत्ता खरेदी करणे, परंतु काही फेरफार सेवानिवृत्त झाल्यानंतर करणे, त्यामुळे संबंधितांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी होऊन वेळेत कार्यवाही पूर्ण करणे व संबंधितांना त्वरीत कार्यमुक्त करणे, ज्यांनी शासनाचे नियमांचे व शासन निर्णयांचे उल्लंघन करुन पानझडे यांच्या कंत्राटी पद्धतीने फेरनिवड व मुदतवाढ बाबत प्रस्ताव सादर केले त्यांच्यावर देखील कार्यवाही होणे, या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री.अजय चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील परळ शिवडी विभागातील प्लॉट नं.२०२ (पी.टी.) २४०, ४१६, ४१७ (पी.टी.) या भूखंडावर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, संबंधित विकासकाने उक्त भुखंडावर भव्य सुप्रिम टॉवर आणि भव्य सुप्रिम एनएक्स अशा दोन गगनचुंबी इमारतीचे बांधकाम करणे, सदर बांधकाम करतांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने २२ मजल्याची मंजूरी दिलेली असतांनाही १४ मजल्याचे बांधकाम करणे, तद्‌नंतर इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरही नियमबाह्य पध्दतीने सन २०२१ मध्ये सुधारीत आराखडे एसआरएला सादर करण्यात येणे, सदर आराखडा सादर करतांना वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांनाही ते न घेणे, एका इमारतीच्या बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेला फंजीबल एफएसआय हा विकासकाने एसआरएची कोणतीही परवानगी न घेता मनमानी पध्दतीने दुसऱ्या इमारतीला वापरणे, विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर इमारतीमध्ये २५ टक्के व्हीजीटर पार्किंग राखीव ठेवणे आवश्यक असतांनाही विकासकाने पार्किंग न ठेवणे, त्याचप्रमाणे इमारतीच्या

अप्रकाशित

पोडीयममध्ये विकासकाने स्वतःच्या व्यावसायिक कामाकरीता अनधिकृतपणे कार्यालयाचे बांधकाम करणे, सदर प्रकल्पातील उपकरप्राप्त बांधकामासंदर्भात म्हाडा प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांनाही कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र न घेता पुनर्विकास प्रकल्प राबविणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व विकासकाला दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये एसआरएकडे केलेली असणे, शासनाने यासर्व प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन संबंधित विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(११) **श्री.महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०२१ मध्ये मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती मधील सार्वजनिक शौचालय घोटाळा प्रकरणी मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या चौकशीनुसार नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी अहवाल सादर करणे, सदरच्या चौकशी अहवालात मुख्य आरोपीना क्लिन चिट देण्यात येणे, चौकशी अहवालानुसार सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधित दोषीवर कारवाई न केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या प्रकरणाची पुनश्च: वरिष्ठ दर्जाच्या भा.पो.से. अधिका-यांकडून फेरचौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने फेरचौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **श्री.गणेश नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी सिडकोने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ग्रामस्थांची १ रू. प्रति चौ.मी. या दराने हजारो एकर जमिन संपादित करणे, सदर जमिनीवर राज्य शासनाने नवी मुंबई महानगरपालिका या शहराची निर्मिती करणे, सिडकोने ग्रामस्थांना विविध नागरी व पारंपारिक सुख सुविधा पुरविण्याचे आश्वासन देणे, आजमितीस या शहराची लोकसंख्या १६ लाख असणे, शहरातील सर्व घटकांना अत्यावश्यक सामाजिक सुविधा म्हणून नोड निहाय, प्रभाग निहाय, सेक्टर निहाय, मैदाने, उद्याने, शाळा, नागरी आरोग्य केंद्र, रूग्णालय, माता-बाल रुग्णालय, महिला सक्षमीकरण केंद्र, वाचनालय, अग्निशमन केंद्र, विरंगुळा केंद्र, व्यायाम शाळा, पाण्याच्या टाक्या, जलउदंचन केंद्र, मलउदंचन केंद्र इत्यादी नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता

अप्रकाशित प्रत

भूखंड आरक्षित ठेवलेले असणे, तसेच सदर भूखंडामध्ये भूमिपुत्रांचे उर्वरित पुनर्वसनाकरिता भूखंड आरक्षित ठेवणे बंधनकारक असणे, मुलभूत सुखसुविधा आणि पायाभूत सुविधांचे रक्षण आणि विकास करण्याची जबाबदारी नवी मुंबई महानगरपालिकेवर सोपविण्यात आली म्हणून सदरचे भूखंड सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात यावेत याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तसेच माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, महापालिकेने विकास योजना तयार करताना संभाव्य लोकसंख्येस आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधाकरिता तत्कालीन मा.सर्वसाधारण सभेने प्रारूप विकास योजना व प्रारूप विकास अहवालामध्ये नियोजनाच्यादृष्टीने आरक्षणे प्रस्तावित केलेली असणे, परंतु सिडकोने प्रारूप विकास योजनेमध्ये आरक्षित केलेले भूखंड एमआरटीपी १९६६ मधील विकास आराखडा नियमांचे उल्लंघन करून विक्रीस काढले असणे तसेच आजमितीस देखील सिडको उर्वरित भूखंड विक्रीकरिता जाहिराती काढत असणे, वर्तमान व भविष्यात मुलभूत सुविधांअभावी नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी सिडकोने विकास योजनेतील भूखंडाची विक्री रद्द करण्याची आवश्यकता, त्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री महोदयांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी दिलेली निवेदने, प्रारूप विकास आराखडा सन २०१७ पासून शहर नियोजन मानांकनानुसार निव्वळ सामाजिक विकासासाठीच शिल्लक ठेवलेल्या वास्तव जमिनी या शहरातील भूमिपुत्र आणि स्थानिक रहिवाशी यांच्यासाठीच असणे, महापालिकेने आरक्षित ठेवलेले भूखंड मोफत आणि जमीन मालकीसह कायमस्वरूपी तातडीने नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अग्रिम प्रत

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अजित पवार व पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) सन २०२२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ – पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२.

(२) सन २०२२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ – युनिव्हर्सल ए आय विद्यापीठ, कर्जत विधेयक, २०२२.

---

अग्रिम प्रत

**सहा : मा.मुख्यमंत्री यांचा म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सुत्रानुसार फेररचनेची मागणी कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर दावा सांगितला आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्य शासनाने दावा केलेली ८६५ गावे महाराष्ट्रात समाविष्ट व्हावी म्हणुन महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९.०३.२००४ रोजी मूळ दावा क्र.४/२००४ (Original Suit) दाखल केला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्र. IA ११ / २०१४ वर सुनावणी अंती दि. १२ सप्टेंबर २०१४ रोजी, दाव्यातील साक्षी, पुरावे नोंदविण्यासाठी मा. कोर्ट कमिशनर म्हणुन मा. श्री. मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधीश जम्मु काश्मिर यांची नियुक्ती केली. परंतु सदर दि. १२ सप्टेंबर, २०१४ रोजी पारित केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणा करावी या मागणीसह कर्नाटक शासनाने दि. ०६ डिसेंबर २०१४ रोजी अंतरिम अर्ज क्र. IA १२/२०१४ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. सदर सीमावादाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असुन ही कायदेशीर लढाई महाराष्ट्र शासन सर्व ताकदीने लढत आहे. महाराष्ट्राच्या बाजुने खटला चालविण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी असणारे ज्येष्ठ, अनुभवी व नामांकीत विधिज्ञांची पॅनलवर नियुक्ती केली आहे.

**आणि ज्याअर्थी,** सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांचेवर अत्याचार केले जाणे, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर मा. समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करुन त्यांचे भुखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे तसेच अल्पसंख्य आयोगाने व मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपुर्वक केला जात आहे.

या सर्व बाबींवर केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी दि. १४ डिसेंबर, २०२२ रोजी

मा. केंद्रीय गृहमंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता शांतता ठेवण्याकरिता एकमत केले असतांना देखील विपरीत भुमिका कर्नाटक शासनाने घेतलेली आहे. दरम्यान कर्नाटक विधीमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या दि. २२ डिसेंबर, २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडुन जाणीवपुर्वक केले जात असुन कर्नाटक शासनाची ही भुमिका लोकशाही संकेतास धरुन नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तीनिशी याबाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे.

**आणि ज्याअर्थी,** सद्य:स्थितीत कर्नाटक राज्यात असलेल्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषिक खेडे घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ठ होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी विविध सोईसुविधा व सवलती उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या लाभांबरोबरच अभियांत्रिकी / वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी विशेष सवलत, भारतीय प्रशासकीय सेवा पुर्वप्रशिक्षणासाठी सवलत, सारथी व इतर शासकीय संस्थांच्या मार्फत विहीत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**त्याअर्थी** आता महाराष्ट्र विधानसभा याव्दारे कर्नाटक प्रशासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दांत निषेध करण्याबरोबरच महाराष्ट्र विधानसभा नियम ११० नुसार, -

१. कर्नाटकातील मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.
२. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला सीमावाद हा सनदशीर मार्गाने अत्यंत खंबीरपणे दृढ निश्चयाने व संपुर्ण ताकदीनिशी लढा देण्यात येईल.
३. ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे.
४. तसेच याबाबत केंद्र शासनाने मा. गृह मंत्री भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अमंलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा तसेच सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत सरकारला समज देण्यात यावी.

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री अजित पवार, अजय चौधरी, अनिल पाटील, अमित देशमुख, अमित झनक, अशोकराव चव्हाण, आदित्य ठाकरे, इंद्रनिल नाईक, कैलास गोरंट्याल, चंद्रकांत नवघरे, छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, दिलीप वळसे-पाटील, देवेंद्र भुयार, धर्मरावबाबा आत्राम, धिरज देशमुख, नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री नितीनकुमार देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखडे, बाबासाहेब पाटील, बाळासाहेब आजबे, भास्कर जाधव, मनोहर चंद्रिकापूरे, मोहनराव हंबर्डे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रणजीत कांबळे, रविंद्र वायकर, राजु पारवे, राजू कारेमोरे, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री राजेश टोपे, राजेश एकडे, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री विकास ठाकरे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, विनोद निकोले, संजय बनसोडे, संदिप क्षिरसागर, सहसराम कोरोटे, सुनिल केदार, सुनिल प्रभू, सुभाष धोटे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, धनंजय मुंडे, माधवराव पाटील-जवळगावकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची आवश्यकता, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, तसेच, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील पिकांचे, विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करुन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारले

अप्रकाशित

असणे, विदर्भात कापसावर लाल्या रोगाचा व संत्र्यांवर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असणे, विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात सहा दिवसांत सात युवा शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करु", ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, सन २०१५ ला २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व २०२१ ला निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, बांगलादेश सरकारने आयात शुल्कात वाढ केल्याने, मागणी करुनही केंद्र सरकारने हस्तक्षेप न केल्याने व राज्य सरकारनेही केंद्र सरकारकडे पाठपुरावा न केल्याने विदर्भातील संत्र्याच्या निर्यातीत ८० ते ९० टक्के घट येऊन शेतकरी अडचणीत आला असणे, नैसर्गिक आपत्ती व अन्य कारणांमुळे विदर्भातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आला असताना सोयापेंड व कापूस आयात शुल्काबाबत निर्णय न घेतला जाणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचे धान विक्रीअभावी पडून असणे, विदर्भात अधिवेशन सुरु असताना माओवाद्यांनी स्थानिक आमदार आणि प्रशासनाला परिणाम भोगण्याची धमकी दिलेली असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील प्रकल्प खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, भिलाईप्रमाणे मोठ्या प्रकल्पाची संधी महाराष्ट्राने गमावली असणे, यावर फेरविचार होण्याची आवश्यकता असणे, विदर्भात खनिज उत्खननानंतर त्यावर आधारित उद्योगांची उभारणी विदर्भातच व्हावी, अशी विदर्भवासियांची मागणी असणे, नांदेड ते जालना या द्रुतगती जोडमहामार्गाचे काम तसेच समृध्दी महामार्गाचे विस्तारीकरण नागपूर ते भंडारा-गोंदिया आणि नागपूर ते गडचिरोली करण्याची आवश्यकता, समृध्दी महामार्गाच्या नियोजित आराखड्यातील कृषी क्लस्टरांचे काम प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणत्याही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे प्रलंबित प्रश्न, तसेच, विदर्भातील सॅफ्रन प्रकल्प, राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य संस्थान (एनआयएमएच), केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ (श्रमिक शिक्षा बोर्ड) या संस्था विदर्भातून इतर राज्यात स्थलांतरित करण्यात आल्याने विदर्भवासीयांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झालेली असणे, मागील सरकारने दिनांक २९ जून, २०२२ रोजी वैधानिक विकास

अग्रिम प्रत

मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसणे, एमएसएमई गुंतवणुकीत विदर्भ व मराठवाडा हे दोन विभाग मागे पडले असताना या मागास आणि राज्याच्या इतर भागात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे विदर्भ, मराठवाडा व राज्याच्या इतर भागात येणारे प्रकल्प रखडलेले असणे, मिहान प्रकल्पात गुंतवणूक करार झाले असताना कंपन्यांचा फारसा प्रतिसाद न मिळणे, रोजगार निर्मितीवर त्याचा परिणाम झाला असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असणे, तसेच, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **सर्वश्री रणधीर सावरकर, समीर कुणावार, प्रशांत बंब, अभिमन्यू पवार, भरतशेट गोगावले, राम सातपुते, ज्ञानराज चौगुले, राजेश पवार, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री संजय शिरसाट, नारायण कुचे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, रमेश बोरनारे, प्रदिप जैस्वाल, ॲड आकाश फुंडकर, ॲड आशिष जैस्वाल, सर्वश्री दादाराव केचे, बालाजी कल्याणकर, संभाजी पाटील-निलंगेकर, मोहन मते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री किशोर जोरगेवार, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, संजय सावकारे, बच्चू कडू,**

अग्रिम प्रत

**मंगेश चव्हाण, भिमराव तापकीर, सुरेश भोळे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रशांत ठाकूर, नितेश राणे, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, तानाजी मुटकुळे, हरिभाऊ बागडे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, सुनिल कांबळे, ॲड राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री राम कदम, किसन कथोरे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, टेकचंद सावरकर, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, डॉ. तुषार राठोड, प्रा.डॉ. अशोक उईके, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, प्रकाश भारसाखळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

मागील सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प असेल, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळवून हा प्रदेश सुजलाम् सुफलाम् करणारा प्रकल्प असेल अथवा विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी युती सरकारच्या काळात सन २०१७-१८ च्या दरम्यान मंजूर करण्यात आलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादींचे काम थंड बस्त्यात टाकण्यात येणे, विदर्भ-मराठवाड्यासह उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी वरदान ठरणारा समृद्धी महामार्ग डिसेंबर २०२१ मध्ये सुरू होणे अपेक्षित असताना मागील सरकारच्या संथ कारभारामुळे प्रकल्पाचे काम रखडणे, परंतु नव्या सरकारने जनभावना लक्षात घेऊन नुकतेच समृद्धी महामार्गाचे पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करणे, त्याच वेळेस समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचेही काम तात्काळ पूर्ण होऊन त्याचेही लोकार्पण होण्याची जनतेची वाढती मागणी, एडीबीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हे निवडताना विदर्भातील जिल्ह्यांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास येणे, गत २ वर्षांत विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अतिवृष्टी होऊनही पुरेशी मदत शेतकरी बांधवांना न मिळणे, शेतकऱ्यांची दिवसा वीज मिळण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, मागील सरकारच्या कार्यकाळातील अक्षम्य दुर्लक्षामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषात वाढ होणे, जुलै २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर विदर्भ-मराठवाड्याशी संबंधीत वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशाकडे वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेला चालना मिळणे, रस्त्यांचे जाळे विकसित करण्यासाठी विदर्भ-मराठवाड्यातील जिल्ह्यांना पुरेसा निधी प्राप्त होणे, विदर्भ, मराठवाडा व कोकणातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी नवीन सरकारने विशेष तरतूद करण्याची गरज, तसेच धान, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा याकरीता धान, सोयाबीन व संत्रा

अग्रिम प्रत

इत्यादी आधारीत प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची तसेच, कापसावर प्रक्रिया उद्योगाला गती देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण आणण्याची ज्यामध्ये पारदर्शकता येऊन खऱ्या अर्थाने कापूस प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल अशा तरतूदी असण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात आरोग्य सुविधांना बळकटी मिळण्यासाठी या भागातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची नवीन शासनाने केलेली घोषणा व या घोषणेची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी याकरीता मागील सरकारने कोणतेही विशेष प्रयत्न न करणे, विशेषत: १८ महिन्यांमध्ये कॅबिनेट कमिटी ऑन इंडस्ट्रीजची एकही बैठक न घेणे, परंतु नवीन शासनाने नुकतीच ७०००० कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देऊन विदर्भ-मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करणे, मागील ५ महिन्यांत या सरकारने विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनेक प्रकल्पांना चालना मिळालेली असताना पुढील काळात वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणा-या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना तसेच एडीबी व एचएएम योजनेतंर्गत रस्त्यांचे जाळे विकसित करण्याची व संत्रा, धान, सोयाबीन व कापूस इत्यादी पिकांवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी नव्याने धोरण आखण्याची आवश्यकता, विशेषत: SMART, MAGNET योजनेतंर्गत प्रकल्प मंजूर करताना विदर्भ, मराठवाडा या मागास भागाला प्राधान्य देण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ व जलयुक्त शिवार टप्पा-२ ची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याची गरज, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी याकरीता प्रत्येक सबस्टेशनला मुख्यमंत्री कृषी सौरवाहिनीला जोडण्याची आवश्यकता, तसेच नव्याने उद्योग विदर्भ-मराठवाड्यात यावेत याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही."

अग्रिम प्रत

नऊ : **सर्वश्री समीर कुणावार, मंगेश कुडाळकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री संजय गायकवाड, रणधीर सावरकर, सदा सरवणकर, ॲड आशिष शेलार, श्री दिलीप लांडे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रकाश आबिटकर, राजेंद्र पाटणी, ज्ञानराज चौगुले, अतुल भातखळकर, संतोष बांगर, डॉ. देवराव होळी, डॉ. बालाजी किणीकर, ॲड आकाश फुंडकर, श्री. अनिल बाबर, प्रा.डॉ. अशोक उईके, सर्वश्री सुहास कांदे, चंद्रकांत निंबा पाटील, सौ. मंजुळा गावित, सर्वश्री संतोष दानवे, राम कदम, सर्वश्रीमती माधुरी मिसाळ, मनिषा चौधरी, सर्वश्री राजेश पवार, सचिन कल्याण-शेट्टी, अभिमन्यू पवार, डॉ. राहुल आहेर, श्री. राम सातपुते, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री कृष्णा खोपडे, नितेश राणे, विनोद अग्रवाल, संभाजी पाटील-**

**निलंगेकर, सुनिल कांबळे, समाधान आवताडे, हरिष पिंपळे, प्रकाश आवाडे, नामदेव ससाणे, किसन कथोरे, प्रताप अडसड, मदन येरावार, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री प्रशांत बंब, योगेश सागर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, मोहन मते, गणपत गायकवाड, सुनिल राणे, सुरेश भोळे, प्रकाश भारसाखळे, जयकुमार रावल, मिहिर कोटेचा, ॲड॰ राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री सुभाष देशमुख, अमित साटम, ॲड॰ पराग अळवणी, श्री. पराग शाह, श्रीमती विद्या ठाकूर, डॉ. भारती लव्हेकर, कॅ.आर. तमिल सेल्वन, श्री. गणेश नाईक, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय केळकर, टेकचंद सावरकर, कृष्णा गजबे, किर्तीकुमार भांगडीया, तानाजी मुटकुळे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, प्रशांत ठाकूर, राणाजगजितसिंह पाटील, काशिराम पावरा, संजय सावकारे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, संजिवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व सन २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे, मात्र विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजाराचा निधी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिलेला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुध्द महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची

अप्रकाशित प्रत

आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी फ्रीहोल्ड करण्याकरीता संबंधीत समितीचे गठन तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.**

"अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदांबाबत" या विषयावरील ॲड. आशिष शेलार व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४९७८१ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.**

"रायपूर (ता.जि.बुलढाणा) येथे पोलीस स्टेशन आणि कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थान बनविण्याबाबत" या विषयावरील श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांचा दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ९९ मधील प्रश्न क्रमांक ४०३४६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २६ डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

अप्रकाशित प्रत